सकाळ




**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ : विश्वदीप रॉय चौधरी यांच्या हस्ते योगासनांद्वारे "शिव वंदना'' सादर केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. या वेळी रॉय चौधरी यांच्यासह डॉ. दीपक टिळक, डॉ. अभिजित जोशी आणि विद्यार्थी.**

# 'टिमवि'त योगासनांतून शिव वंदना

**पुणे, ता. ४ :** टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या आयुर्वेद विभागातील योगाच्या पदव्युत्तर पदवी (एम. ए.) अभ्यासक्रमाच्या १६ विद्यार्थ्यांनी अवघ्या १७ मिनिटांत ७० योगासनांतून 'शिव वंदना' सादर केली. एशिया बुक ऑफ रेकॉर्ड आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड या संस्थांनी या उपक्रमांची दखल घेत घेतली आहे.

महाशिवरात्रीनिमित्त विद्यापीठात योगासनांच्या प्रात्यक्षिकाद्वारे 'शिव वंदना' सादर झाली. 'मोस्ट योग स्टान्सेस ऑन शिव वंदना' असे या उपक्रमाचे नाव होते. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दीपक टिळक, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड आणि इंडिया बुक ऑफ रेकॉडचे परीक्षक विश्वदीप रॉय चौधरी, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अभिजित जोशी, डॉ. गीताली टिळक आदी उपस्थित होते. विविध प्रकारची योगासने सादर करीत शिवस्तुती रचनेवर आधारित अनोखी 'शिव वंदना' विद्यार्थ्यांनी सादर केली. या विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. डॉ. मनोज जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

> गेल्या तीन महिन्यांपासून योगासनांच्या प्रात्यक्षिकांचा सराव सुरू आहे. योगासनाद्वारे 'शिव वंदना' सादर करण्याचा अनोखा प्रयोग आम्ही केला याचे समाधान आहे.''
> - प्रकाश ढोकाते, विद्यार्थी

> कमीत कमी वेळात जास्तीत जास्त योगासने सादर करत हे प्रात्यक्षिक करण्यात आले. यामध्ये विद्यार्थिनींबरोबरच महिलांचाही सहभाग होता.
> - सलोनी जाधव, विद्यार्थिनी

Pune, Main
05/03/2019 Page No. 2